# BDC LIBRARY

## New Paper Clipping

**A.Y. 2024-2025**

# नाथाची पाग माळ रानावर टाकले एक हजार सीड बॉल

**पाटण**, दि. ३० : पाटण रोटरी क्लब, कोयना एज्युकेशन सोसायटीचे माने- देशमुख विद्यालय, सौ. सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा आणि बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने नाथाची पाग येथील माळावर तयार करण्यात आलेले एक हजार सीड बॉल टाकण्यात आले.

रोटरी क्लब आणि कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण यांच्यामार्फत पर्यावरण संवर्धन जनजागृतीचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. एप्रिल आणि मे मध्ये तालुक्यातील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाळांमध्ये दुर्मीळ आणि वनौषधी बियांची साठवणूक करण्यात आली होती. मुलांना पर्यावरण संवर्धन आवड निर्माण व्हावी या हेतूनेच त्यांच्याकडून त्या बियांचे सीडबॉल तयार केले आणि हे सीडबॉल पाटण तालुक्यातील विविध माळरानावर पावसात टाकण्यात येणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पाटणपासून जवळ असणाऱ्या नाथाची पाग येथे असणाऱ्या माळावर रोटरी क्लब, माने- देशमुख विद्यालय, सौ सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा आणि बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण यांचे विद्यार्थी आणि रोटरी क्लब यांच्याकडून जवळपास एक हजार सीडबॉल टाकण्यात आले.

यावेळी रोटरी क्लब, पाटणचे अध्यक्ष रो. संजीव चव्हाण, सचिव रो. शिलादेवी पाटणकर, रो. डॉ. विद्या पाटील, रो. डॉ. अर्चना देशमुख, रो. डॉ. वीणा नांगरे, रो. अश्विनी चव्हाण, रो. जयदीप फुटाणे, रो. डॉ. विलासराव कळंत्रे, रो. डॉ. संजय पवार, प्रा. सुमित लाड. सौ सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा, माने -देशमुख विद्यालय, बाळासाहेब देसाई कॉलेज, श्रीमंत दादासाहेब पाटणकर हायस्कूल, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.